केंद्र शासन पुरस्कृत स्वजलधारा योजनेच्या अंमलबजावणीसाठी संस्थात्मक यंत्रणा, अंमलबजावणी व्यवस्था व निधी वाटपाबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्र.ग्रापापु १००५/प्रक्र.२९/पापु ०७,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. दिनांक :- १४ मार्च, २००५.**

वाचा :- १) शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.ग्रापापु १००४/प्रक्र.४७/पापु ०७, दिनांक २ एप्रिल,२००४.

२) केंद्र शासनाच्या आदिवासी कार्य मंत्रालयाचे अ.शा.पत्र क्र.१७०१४/१०/२००४ एस अॅन्ड एम, दिनांक २२ डिसेंबर,२००४.

प्रस्तावना :

केंद्र शासनाने ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम लोकसहभाग, मागणी आधारित, सामुहिक निर्णय प्रक्रिया व विकेंद्रित अंमलबजावणी या तत्वावर राबविण्यासाठी **"क्षेत्र सुधारणा पथदर्शी प्रकल्प"** देशातील काही निवडक जिल्हयात सन १९९९ पासून सुरु केला. त्यात महाराष्ट्रातील रायगड, धुळे, नांदेड व अमरावती या चार जिल्हयांचा समावेश आहे.

२. **"क्षेत्र सुधारणा पथदर्शी प्रकल्प"** सुधारित करुन तो संपूर्ण देशात राबविण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतला व त्याला **"स्वजलधारा"** असे नामाभिदान देण्यात आले आहे. **"स्वजलधारा"** योजनेबाबत मार्गदर्शक सूचना केंद्र शासनाने २००३ मध्ये निर्गमित केल्या आहेत. या प्रती सर्व जिल्हा परिषदांना वितरित करण्यात आल्या आहेत. या सुचनानुसार ग्रामीण पाणी पुरवठा योजनेच्या निवड, नियोजन, अंमलबजावणी व देखभाल दुरुस्तीची संपूर्ण जबाबदारी ग्राम स्तरावर सोपविण्यात आली असून जिल्हा स्तरावर पंचायत राज व्यवस्थेची व राज्य स्तरावर राज्य शासनाची या योजनेबाबत भूमिका व जबाबदारी स्पष्ट करण्यात आली आहे. या सुचनानुसार स्वजलधारा व संपूर्ण स्वच्छता अभियान या केंद्र शासन पुरस्कृत प्रकल्पांच्या राज्य स्तरावरील अंमलबजावणीसाठी राज्यस्तरावर एक स्वतंत्र **"राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशन"** तसेच, जिल्हा स्तरावर **"जिल्हा कार्यकारी समिती"** गठीत करण्याबाबत संदर्भातील दिनांक २ एप्रिल,२००४ च्या शासन निर्णयाव्दारे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

३. केंद्र शासन पुरस्कृत वर्धित वेग ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम, स्वजलधारा व संपूर्ण स्वच्छता अभियान याव्दारे ग्रामीण भागात पिण्याचे पाणी व स्वच्छतेच्या सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. आदिवासी उपयोजनेतील कार्यक्रमांबरोबरच हे कार्यक्रमही आदिवासी क्षेत्रात राबविले जातील याची खबरदारी घेणे आवश्यक आहे. हे उदिष्ट लक्षात घेऊन केंद्र शासनाचा पेयजल पुरवठा विभाग व आदिवासी कार्य मंत्रालय यांच्या सचिवांची

बैठक दिनांक २४ जून, २००४ रोजी झाली. या बैठकीतील निर्णयानुसार केंद्र शासनाच्या आदिवासी कार्य मंत्रालयाने संदर्भातील २ येथील दि.२२ डिसेंबर, २००४ च्या अर्ध शासकीय पत्राने कळविले आहे की, राज्याच्या आदिवासी क्षेत्रातील लाभार्थ्यांना पिण्याचे पाणी पुरविणे व स्वच्छतेच्या सुविधा उपलब्ध करणे या कार्यक्रमांचा पूर्ण लाभ मिळावा याकरिता राज्य आणि जिल्हा स्तरावरील अधिका-यांत चांगला समन्वय असावा यादृष्टीने मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनमध्ये सचिव, आदिवासी विकास यांचा आणि जिल्हा पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनमध्ये जिल्हा आदिवासी कल्याण अधिकारी यांचा समावेश करावा.

**शासन निर्णय :**

राज्याच्या आदिवासी क्षेत्रातील लाभार्थ्यांना पिण्याचे पाणी पुरविणे व स्वच्छतेच्या सुविधा उपलब्ध करणे या कार्यक्रमांचा पूर्ण लाभ मिळावा याकरिता समन्वय असण्याच्या दृष्टीने संदर्भातील क्रमांक १ येथील दिनांक २ एप्रिल, २००४ च्या शासन निर्णयाअन्वये गठीत करण्यात आलेल्या

१) राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनच्या **शिखर समितीमध्ये** प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग यांचा सदस्य म्हणून समावेश करण्यात येत आहे.

२) राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनच्या **कार्यकारी समितीमध्ये** उप सचिव, आदिवासी विकास विभाग यांचा सदस्य म्हणून समावेश करण्यात येत आहे.

३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या अध्यक्षतेखालील **जिल्हा कार्यकारी समितीमध्ये** प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांचा सदस्य म्हणून समावेश करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या अ.देशानुसार व नावाने,

२६/१/

**( सुधीर ठाकरे )**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रति,
१. मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव.
२. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव.
३. मा. उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव.
४. मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
५. मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
६. मा. अध्यक्ष, जिल्हा परिषद (सर्व)
७. मा. मुख्यसचिव, महाराष्ट्र शासन, मुंबई.
८. सर्व मत्रालयीन विभागांचे अप्पर मुख्य सचिव, प्रधान सचिव व सचिव

\\Ws०७\d\BACKUP WS०७\year २००५\Gr.cr.२९.doc

९. प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुबई
१० राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनच्या शिखर समितीचे व कार्यकारी समितीचे सर्व सदस्य
११ जिल्हा कार्यकारी समितीचे सर्व सदस्य
१२ विभागीय आयुक्त (सर्व) .
१३ आयुक्त, आदिवसी विकास, नाशिक
१४ सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
१५ संचालक,भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा,पुणे
१६ महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
१७ जिल्हाधिकारी (सर्व)
१८ अपर आयुक्त, आदिवसी विकास, ठाणे, नाशिक, अमरावती व नागपूर
१९ मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद (सर्व)
२० प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प (सर्व)
२१ मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
२२ उपसंचालक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा (सर्व)
२३ जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा (सर्व)
२४ जिल्हा माहिती अधिकारी (सर्व)
२५ कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,जिल्हा परिषद (सर्व)
२६ कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
२७ उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग,जिल्हा परिषद (सर्व)
२८ उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा यांत्रिकी उपविभाग,जिल्हा परिषद (सर्व)
२९ पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षकीय अधिकारी व कार्यासने.
३० निवडनस्ती (पापु-०७), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग